




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १२१ •गुरूवार, दि. ३१ जुलै २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा महायुती सरकारला झटका

## नैसर्गिक मृत्यू नव्हे पोलीस मारहाणीतच सोमनाथचा मृत्यू



**मुंबई । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी राज्यात गाजलेल्या सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महायुती सरकारला मोठा झटका दिला आहे. सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू नैसर्गिकरित्या झाला होता, असा दावा पोलीस आणि राज्य सरकारने केला होता. मात्र, पोलिसांच्या मारहाणीमुळे पोलीस कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्याचा आरोप झाला होता. प्रकाश आंबेडकर यांनी हे प्रकरण न्यायालयात लावून धरले होते. त्यासाठी प्रकाश आंबेडकर यांनी अनेक वर्षांनी काळा कोट चढवून कोर्टात युक्तिवादही केला होता. यानंतर उच्च न्यायालयाने सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणात गुन्हा दाखल करण्याचा आदेश राज्य सरकारने निकाल दिला होता. याविरोधात राज्य सरकारने तात्काळ सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयानेही मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल उचलून धरत सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचा आदेश कायम ठेवला आहे. हा महायुती सरकारसाठी मोठा झटका मानला जात आहे. त्यामुळे सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाशी संबंधित असलेल्या पोलिसांवर गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली केल्याप्रकरणी राज्य सरकारही अडचणीत येण्याची शक्यता आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य आणि इतर विरुद्ध विजयबाई वेंकट सूर्यवंशी या खटल्यात माननीय

▶▶ उर्वरित पान २ वर

# मुलीवर बापाचा अत्याचार, मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा : अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वतःच्या रक्ताचं भान न ठेवता अल्पवयीन मुलीवर सातत्याने अत्याचार करणार्या बापाला अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने मरेपर्यंत जन्म ठेपेची शिक्षा सुनावली आहे. हा निर्णय सत्र न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी दिला असून, समाजमन हादरवणार्या या घटनेत न्यायालयाने स्पष्ट केले की आरोपीचं कृत्य अत्यंत अमानवी असून त्याला माफ करता येणार नाही.



पिडीत मुलगी आपल्या आई-वडीलांसह उसतोडीसाठी गेली होती. अचानक तब्येत बिघडल्याने दवाखान्यात तपासणी केली असता, ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. आई विश्वासात घेऊन विचारल्यावर मुलीने सांगितले की, तिचा स्वतःचा बाप बाळु उर्फ बाळासाहेब महादेव गायकवाड

▶▶ उर्वरित पान २ वर

# वाल्मिक कराडचा चेला गोट्या गित्तेचं अघोरी कृत्य

## 'राम नाम सत्य है' म्हणत रात्री दाराबाहेर ठेवायचा नैवेद्य अन्...

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये वाल्मिक कराडची टोळी पुन्हा क्टीव्ह झाल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर आता वाल्मिक कराडचा चेला गोट्या गित्ते याचे नवनवीन कारनामे समोर येऊ लागले आहेत . गोट्या गित्ते हा परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर



### • कोण आहे गोट्या गित्ते ?

ज्ञानोबा मारुती गीते असं गोट्या गीतेचं खरं नाव आहे. वाल्मिक कराडचा तो राईट हँड असल्याचं सांगितलं जातं. परळीतील नंदागौळ या गावचा तो रहिवासी असून सराईत गुन्हेगार आहे. गेल्या १५ वर्षांपासून त्याच्यावर परळीसह परभणी, लातूर, बीड, पिंपरी-चिंचवड इथं अनेक गुन्हे दाखल आहेत. तो आख्या महाराष्ट्राला बंदुका पुरवत असल्याचं सांगितलं जात आहे. बीडमध्ये अनेकांच्या कमरेला दिसणारी पिस्तुलं या गोट्या गीतेनंच पुरवल्याचंही सांगितलं जातं.

# दुचाकी चोरी प्रकरणातील आरोपी सहाय्यक फौजदारास जामीन मंजूर

**बीड । प्रतिनिधी**

येथील सरकारी दवाखाना त्यानंतर जालना रोडवरील काकू नाना हॉस्पिटल समोरून २ दुचाकी चोरी झाल्याने दिनांक ३१-०५-२०२५ रोजी बीड शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा क्रं.९१/२०२५ नोंद झाला आणि त्यानंतर जिल्हा परिषद बीड येथील तळघरातील पार्किंग मधून १ दुचाकी चोरी झाल्याने दिनांक ०५-०६-२०२५ रोजी बीड शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा क्रं.९७/२०२५ नोंद झालेला होता. या गुन्ह्यासंबधी तपासात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांतर्फे सापळा रचून आरोपी अमित मधुकर सुतार, धंदा -



सहाय्यक फौजदार, रा. खोकरम ोहा, ता. शिरूर कासार यांस अटक करण्यात येवून मा. अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयात हजर आले असता गुन्ह्याच्या अधिक तपासकामी आरोपीस पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# महादेव मुंडे यांचे कुटुंबीय घेणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट

## २१ महिन्यांपासून न्यायाची प्रतिक्षा, मुख्यमंत्र्यांसमोर उद्या मांडणार कैफियत

**बीड । प्रतिनिधी**

परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांचा २१ महिन्यापूर्वी निर्घुण खून करण्यात आला होता. मात्र आज २१ महिन्यांचा काळ लोटल्यानंतर हि मुंडे परिवाराला न्याय मिळालेला नाही. त्यामुळे आता उद्या (गुरुवार, ३१ जुलै) दिवंगत महादेव मुंडे यांचे कुटुंबीय



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेणार आहेत. या भेटीदरम्यान मुंडे कुटुंबीय आपली सर्व कैफियत मुख्यमंत्र्यांसमोर मांडणार आहेत. यासाठी आज सायंकाळी मुंडे कुटुंबीय मुंबईसाठी रवाना होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मराठा

▶▶ उर्वरित पान २ वर

# पती-पत्नीची भर रस्त्यावर हाणामारी

**बीड । प्रतिनिधी**

पती पत्नीमध्ये सकाळी नगर रोडवर वादा वादी होवून चांगल्याच मारामाऱ्या झाल्या. पत्नीने गाडीवर बसलेल्या पतीला झोडपले. पतीनेही प्रतिउत्तरात पत्नीला मारहाण केली. या दोघांची मारहाण नगर रोडवरील लोक पाहत होते. काहींनी त्यांचा व्हिडिओ शुट केला व सोशल मिडीयावर टाकला.

पत्नी विदर्भातील तर पती बीड येथील असल्याचे सांगण्यात येते. या दोघांमध्ये भांडण कोणत्या कारणावरून झाले ते मात्र समजू शकले नाही. हे पती पत्नीचे भांडण पोलीस ठाण्यापयरत गेले होते. आज सकाळी नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या एका मोटार सायकलवर आलेल्या पतीस पत्नीने अडवून त्यास जाब विचारला. या दोघांच्या बाचाबाचीतून दोघात चांगलेच



भांडण झाले. पत्नीनेच पतीला मारहाण करण्यास सुरूवात केली. पतीनेही प्रतिउत्तराखातर पत्नीला मारहाण केली. मात्र पत्नीने आपल्या पतीस चांगलेच धो धो धुतले. काहींनी या मारहाणीचा व्हिडिओ शुट केला व सोशल मिडीयावर टाकला. पत्नी विदर्भातील तर पती बीड मधील असल्याचे सांगण्यात येते. प्रेम प्रकरणातून या दोघांचे लग्न झाले होते. लग्नाच्या काही दिवसानंतर या दोघात तिसरी आल्याची चर्चा होत आहे. हे पती पत्नीचे भांडण शिवाजी नगर पोलीस ठाण्यापर्यत गेले होते.

# ॲड. प्रकाश कवठेकर यांचा उद्योग गौरव पुरस्काराने सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

येथील तेजस ग्रुपचे चेअरमन ॲड. प्रकाश कवठेकर यांनी उद्योग व्यवसायात भरारी घेतली असून पुणे येथील केपीएम मिडियाच्या वतीने त्यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार जाहिर केला होता. या पुरस्काराचा हिंजेवाडी (पुणे) येथे हॉटेल राजमुद्रा येथे दि. २७



जुलै रोजी मोठ्या थाटात वितरण सोहळा संपन्न झाला. बीड येथील तेजस उद्योग समूहाचे चेअरमन व माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. प्रकाश कवठेकर यांना ऑक्सीतेज मिनरल वॉटर या ब्रँड साठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तेजस बेवरेजेस या कंपनीच्या अंतर्गत ऑक्सितेज मिनरल वॉटर मार्केटिंग प्रोडक्शन क्वालिटी हे या कंपनी ने जपले ▶▶ उर्वरित पान २ वर






# आ.संदीप क्षीरसागरांनी बीड महावितरणाशी संबंधित प्रश्न मांडले मंत्रालयीन बैठकीत

## अनियमित वीजपुरवठा, कंत्राटदारंकडून होत असलेल्या निकृष्ट कामांची केली तक्रार

## आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने आयोजित केली होती बैठक

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी महावितरण विभागाचा गलथान कारभाराची सभागृहात चीरफाड केली होती. गुत्तेदार आणि अधिकारी यांच्या मिलीभगत ने चालू असलेले सर्व गैरप्रकार मुद्देसूद मांडले होते. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या उर्जा राज्यमंत्री ना.मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली, बीड जिल्ह्यातील उर्जा विभागांशी संबंधित प्रश्नांवर बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बीड विधानसभा मतदारसंघातील महावितरणशी संबंधित असलेले विविध प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांनी मांडले.

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ८ जुलै रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी महावितरण विभागाचा गलथान कारभार उघड केला होता. गुत्तेदार आणि अधिकारी संगनमत करून कशाप्रकारे गैरप्रकार करतात हे उघडकीस आणले होते. हा मुद्दा अधिवेशनात गाजला होता. त्यानंतर याची दखल घेत सरकारने बुधवारी (दि.३०) रोजी



मंत्रालयात महाराष्ट्र राज्याच्या उर्जा राज्यमंत्री ना.मेघनाताई बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्ह्यातील उर्जा विभागाशी संबंधित असलेल्या प्रश्नांवर बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील विद्युत पुरवठ्यातील अनियमितता, तसेच कंत्राटदारांमार्फत होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत थेट तक्रार मांडली. तसेच नागरिकांच्या त्रासदायक अनुभवांना वाचा फोडत, विद्युत पुरवठा सुरळीत आणि दर्जेदार व्हावा यासाठी उर्जा विभागाने तात्काळ कार्यवाही करावी अशी स्पष्ट मागणी केली.

### • आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठकीत उपस्थित केलेले मुद्दे आणि मागण्या

- RDSS योजनेंतर्गत दि.१५.०९.२०२३ रोजी हायटेक ईलेक्ट्रीकलच्या नावे कार्यारंभ आदेश पारीत आहेत. आजतागायत ती कामे पुर्ण न होता ग्रामीण व शहरी भागात निकृष्ट दर्जा व अर्धवट स्वरूपाची कामे केल्याने तक्रारी प्राप्त आहेत. यावर तातडीने कार्यवाही व्हावी.
- पाली ता. बीड येथे मंजुर असलेले ३३ के.व्ही. उपकेंद्राचे कामाची निविदा प्रसारित करणे
- ताडसोन्ना, लिंबारुई, च-हाटा, आहेरधानोरा, बोरखेड, मोरगाव ता. बीड, पाडळी, आर्वी ता. शिरूर का. व नगर रोड व बलगुजर (बीड शहर) या ठिकाणी नवीन उपकेंद्र मंजुर करणे.
- अंजनवती ता. बीड उपकेंद्रामध्ये अतिरिक्त पावर ट्रान्सफार्मर बसवणे.

▶▶ उर्वरित पान २ वर

◆ पान १ वरून पुढे...

## सोमनाथ सूर्यवंशी...

सर्वोच्च न्यायालयाने आमच्या बाजूने निकाल दिला आहे आणि उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे. यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना या निकालाचे सविस्तर विवेचन केले. त्यांनी म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाने आमची बाजू ऐकून घेतली. हायकोर्टाचा गुन्हा दाखल करण्याचा निकाल कायम ठेवण्यात आला. पोलिसांनी एफआयआर दाखल केला नाही, म्हणून त्यांच्यावर न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघनप्रकरणात कारवाई होते का, ते बघावे लागेल. उच्च न्यायालयाने याप्रकरणात एका आठवड्यात गुन्हा दाखल करा, असे आदेश सरकारला दिले होते, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

सर्वोच्च न्यायालयानेही सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात गुन्हा दाखल का केला नाही, असा सवाल उपस्थित केला. दुर्दैव हे आहे की, राज्य शासनच आरोपी आहे या केसमध्ये. सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू सरकारच्या ताब्यात असताना झाला आहे. मागच्या सगळ्या केसेसमध्ये शासनाचा नेहमीचा प्रयत्न हात झटकण्याचा, तो यामध्येही केला. आम्ही कोर्टाला ही बाब लक्षात आणून दिली. जे काही नियम तयार करायचे आहे, ते आता हायकोर्ट तयार करेल. त्यामुळे भविष्यात पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्यांना न्याय मिळेल, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निकालामुळे राज्य सरकार, पोलीस आणि सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. आम्ही यामध्ये जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांना आरोपी करण्याची मागणी करणार आहोत. कोर्टाचा आदेश असल्याशिवाय सेकंड ओपिनियन देता येत नाही. सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणात सगळ्या गोष्टी तपासल्या गेल्या नाहीत. त्यामुळे आम्ही जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांना आरोपी करा, अशी मागणी करणार आहोत.

या निकालामुळे पहिल्यांदाच पोलीस कोठडीतील मृत्यूप्रकरणांच्या चौकशीसाठी मार्गदर्शक तत्वं आखली जाणार आहेत. आता सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणाची चौकशी एसआयटी स्थापन करुन होईल की आयोगामार्फत हो‍ईल, हे कोर्ट ठरवेल. जो कोणी एसआयटी किंवा आयोग नेमेल, त्याच्यावर नियंत्रण कोणी ठेवायचं हा प्रश्न आहे, तो एकदा निकालात निघाला की चौकशी सुरु होईल. याप्रकरणात प्रशासन हे पोलिसांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. परभणीत जे कोम्बिंग ऑपरेशन झालं त्याची दखल न्यायालयाने घेतली आहे. हे कोम्बिंग ऑपरेशन कुठल्या कारणासाठी आणि कोणत्या कायद्यातंर्गत करण्यात आले, हा चौकशीचा भाग आहे. त्यामुळे आता या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये सहभागी असलेले सर्व पोलीस आरोपी होण्याची शक्यता आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

## मुलीवर बापाचा...

(रा. उमराई) हा गेल्या सात-आठ महिन्यांपासून दारू पिऊन, आई घरी नसताना जबरदस्तीने तिच्यावर अत्याचार करत होता. या नराधम कृत्यामुळे ती गर्भवती राहिली.

पीडितेच्या तक्रारीवरून धारूर पोलिस ठाण्यात दिनांक ७ फेब्रुवारी

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड जिल्ह्यात....

सोनवणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना लवकरात लवकर फार्मर आयडी काढण्याचे आवाहन केले आहे . या विषयाच्या संदर्भाने आणि इतर विषयांबद्दल बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी , सर्व ग्राम महसूल अधिकारी , सर्व कृषी सहाय्यक यांची संयुक्त बैठक सामाजिक न्याय भवन येथे घेतली . यावेळी नुकताच पदभार घेतलेले गटविकास अधिकारी अशोक राठोड , तालुका कृषी अधिकारी अशोक साळी व इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना तहसीलदार शेळके यांनी नमूद केले की फार्मर आयडी ही शेतकऱ्यांची अधिकृत ओळख आहे . याशिवाय कोणत्याही शासकीय शेतीसंबंधित योजनेचा लाभ घेता येणार नाही . यामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना , नमो सन्मान निधी , पीक विमा , पीक कर्ज , नैसर्गिक आपत्ती भरपाई , धान खरेदी , तसेच पंचायत समिती आणि महसूल विभागाच्या विविध योजनांचा समावेश आहे. फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांना आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर ( सी एस सी ) जावे लागेल . यासाठी आधार कार्ड, ७/१२ किंवा ८अ उतारा आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर आवश्यक आहेत. जिल्ह्यातील धारूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ८४.२१ टक्के शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून , वडवणी तालुक्यात हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ६२.७२ टक्के आहे . बीड , आष्टी , केज , गेवराई , पाटोदा आदी तालुक्यांमध्येही नोंदणीचे प्रमाण ७५ टक्क्यांहून अधिक आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की , शेतकऱ्यांनी जर फार्मर आयडी काढले नाही तर भविष्यात कोणतीही सरकारी मदत किंवा योजना त्यांना मिळणार नाही . त्यामुळे ही नोंदणी हक्काची आणि गरजेची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे .

## रेड रन मॅरेथॉन...

होण्याची संधी मिळाली आहे. विजेता स्पर्धकांची नावे : युवक गटात प्रथम रजत बायस (के.एस.के. महाविद्यालय), द्वितीय विशाल सासवडे आणि तृतीय अविनाश कानडे (बलभीम महाविद्यालय). - युवती गटात प्रथम ज्ञानेश्वरी गुजर (बलभीम महाविद्यालय), द्वितीय प्रतिक्षा गंडगे (राजमाता जिजाऊ महाविद्यालय, धारुर) आणि तृतीय शिवानी धनवाडे (भगवान वरीष्ठ महाविद्यालय, आष्टी).

## भविष्यात या...

मार्गदर्शनाखाली शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाचे उद्घाटन बुधवार दिनांक ३० जुलै रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम मंडुरके, नायब तहसीलदार सोनवणे, उपविभागीय पोलिस अधिकारी निरज राजगुरु, पोलिस निरीक्षक संतोषकुमार बांगर, सहायक पोलिस निरीक्षक संतोष जंजाळ, सहायक पोलिस निरीक्षक कोटकर, युवानेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, यांच्यासह परिक्षक सर्वश्री ड. सुभाष निकम, विलास सोनवणे, प्रशांत रुईकर, विष्णूप्रसाद खेत्रे, प्रकाश भुते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते आणि संयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते. महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला गेवराई येथील पारंपरिक टिपरी आणि सोंग महोत्सव हा सांस्कृतिक वारसा सक्षमपणे चालविण्यासाठी व ही परंपरा जतन करून टिपरे व सोंग या कलेला प्रोत्साहन मिळावे यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शहरातील ज्येष्ठ रंगकर्मी आणि तरुण कलावंताना सोबत घेऊन बुधवार दि. ३० जुलै रोजी सायं ६ वाजता बाजारतळ, गेवराई येथे टिपरे आणि सोंगस्पर्धेचे भव्यदिव्य आयोजन केले होते. विजयसिंह पंडित यांनी शिस्तबद्ध नियोजन करून

◆ पान १ वरून पुढे...

२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा क्रमांक २४/२०२४ अंतर्गत ालम ३७६, ३७६ (२) (एफ), ३७६ (२) (आय), ३७६ (२) (एन) आणि पोक्सो कायद्याच्या कलम ४ ( २ ), ६ अन्वये गंभीर आरोप लावण्यात आले. संपूर्ण प्रकरणाचा तपास पीएसआय प्रकाश शेळके यांनी काटेकोरपणे केला. न्यायालयात खटला चालवण्यात आला, त्यामध्ये सरकार पक्षाच्यावतीने एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. पीडिता, तिची आई आणि डीएनए तज्ज्ञ यांच्या साक्षी निर्णायक ठरल्या. सरकारी वकील ॲड. लक्ष्मण फड यांनी प्रकरणात ठामपणे बाजू मांडली. आरोपीने कृत्य केल्याचे ठोस पुरावे न्यायालयात सादर केले गेले. न्यायालयाने नमूद केले की, अशा दुर्मिळ व संतापजनक घटनांमध्ये आरोपीला अधिकतम शिक्षा देणे गरजेचे आहे. त्यामुळे आरोपीस मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.

या कठोर निर्णयाचे सामाजिक संस्था, महिला संघटना व वकील वर्गातून स्वागत होत आहे. सरकारी वकील ॲड. फड यांचे विशेष कौतुक करण्यात येत असून, न्याय व्यवस्थेने जनतेचा विश्वास बळकट केला असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## वाल्मिक कराडचा...

हत्या प्रकरणातील संशयित आरोपी असून अघोरी कृत्य करताना त्याचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे .यात रामनाम सत्य हे म्हणत रात्री दाराबाहेर नैवेद्य ठेवत असल्याचं समोर येत आहे. इतकच नाही तर गोट्या गित्तेचे हातात बंदूक घेतलेले व्हिडिओ देखील आता सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले आहेत.

### 'राम नाम सत्य है' म्हणत घराबाहेर नैवेद्य ..

बीड जिल्ह्यात गुन्हेगारी विश्वात चर्चेत असलेला ज्ञानोबा उर्फ गोट्या गित्ते याचे अघोरी प्रताप समोर आले आहेत. परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्येप्रकरणातील संशयित आरोपी असलेल्या गोट्या गित्तेचे काही व्हिडिओ व्हायरल होत आहेत. गोट्या गित्ते हा वाल्मिक कराडचा अत्यंत जवळचा सहकारी मानला जातो. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक अण्णा माझे दैवत अशा पोस्ट त्याने टाकल्या होत्या. सध्या सोशल मीडियावर गोट्या गित्तेचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये तो रात्रीच्या अंधारात कोणाच्यातरी घरासमोर 'राम नाम सत्य है' असं म्हणत नैवेद्य ठेवताना दिसतो. हा प्रकार तो अशा व्यक्तींच्या घरासमोर करत असल्याचं सांगितलं जातं, ज्यांच्याविरोधात तो वैर धरून आहे. त्यामुळे ही कृती अघोरी असून मानसिक दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे.

वाल्मीक कराड आणि बबन गित्ते याचे शत्रुत्व सर्वांना ज्ञात आहेच.बापू आंधळे खून प्रकरणातील फरार आरोपी असलेला बबन गित्ते याच्या घराबाहेरील हा व्हिडिओ आहे.इतकच नाही तर गोट्या गित्तेचे हातात बंदूक घेतलेले व्हिडिओ देखील आता सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले आहेत.आता यावर प्रशासन काय कारवाई करते का ? याकडे लक्ष लागलेले आहे.

### महादेव मुंडेंच्या हत्येत सहभाग असल्याचा आरोप

◆ पान ४ वरून पुढे...

हा टिपरे महोत्सव यशस्वी केला. टिपरे महोत्सवात गेवराई शहरातील महिलांसाठी भोलोबा (फेर) गित आणि नागमंत्री स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी टिपरे महोत्सव पाहण्यासाठी गेवराई शहरातील लहान मुले, मुली, महिला, तरुण आणि वयोवृद्ध जनतेने उत्सफुर्त गर्दी केली होती. सायंकाळी सात वाजता स्पर्धेचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थिती करण्यात आला. यावेळी ड सुभाष निकम यांनी स्पर्धेचे नियम आणि सुचनांची परिक्षक सुभाष निकम यांनी माहिती दिली. आ. विजयसिंह पंडित यांनी हा टिपरे महोत्सवात सातत्य राखून आयोजन केल्यामुळे कलाकारांना उर्जा मिळाली आहे. शारदा प्रतिष्ठानच्या वतीने हा टिपरे महोत्सव गेल्या अनेक वर्षांपासून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. टिपरे स्पर्धेत ११ संघ तर भोलोबा स्पर्धेत ६ संघ आणि नागमंत्री स्पर्धत दोन सघ सहभागी झाले अशी माहिती त्यांनी दिली. टिपरे स्पर्धेची सुरुवात शिवनेरी संघाने केली. यावेळी विविध मान्यवर आणि पदाधिकारी कार्यकर्ते, महिला, पुरुष, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विक्रमराव मुंडे ...

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे,विजयकांत मुंडे,अतुल मुंडे,प्राचार्या माधुरीताई मुंडे,शाळेच्या प्राचार्या श्रीमती अभिलाषा सारंगदेवोत यांनी शिक्षक धनंजय मस्के सर,अमर शिंदे सर,अविनाश शीलवंत सर,ओम ठोंबरे सर,नवीन कुमार सर,सोमनाथ इंगळे सर,केतन गीते सर,रवी त्रिभुवन सर,निलेश मांजरे सर,शुभांगी सगरे मॅडम,सुमया आतार मॅडम,अश्विनी आरेकर मॅडम, शीला घोळवे मॅडम,दिपाली शेटे मॅडम, आसराबाई अंकुरवाड मॅडम,रत्नगीता शिंदे मॅडम, दिपाली राजमाने मॅडम, झीनत शेख मॅडम, तेजश्री शेटे मॅडम,लीना त्रिभुवन मॅडम,अश्विनी मगर मॅडम, अंजुम शेख मॅडम,प्रणिता वाघमरे मॅडम,वैष्णवी वडगावकर मॅडम,सविता ओहाळ मॅडम, मेघा मोरे मॅडम, अश्विनी शिंदे मॅडम, केतकी मारोटकर मॅडम,शिक्षकेत्तर कर्मचारी गणेश काळे सर,शरद चौरे सर, आदिती पाटील मॅडम,अनिकेत पाटील सर,संदीप कुलकर्णी सर,आणि सर्व मावशी व सर्व ड्रायव्हर,विद्यार्थी आणि पालकांचे आभार मानले.तसेच या टप्प्यावर पोहोचण्यामागे सर्वांच्या मेहनतीचे व समर्पणाचे मोठे योगदान असल्याचे शाळेच्या प्राचार्या श्रीमती अभिलाषा सारंगदेवोत यांनी सांगितले. शाळेला आज अधिकृतपणे CBSE अधिसूचना क्रमांक (Affiliation Number) प्राप्त झाला असून केज तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी ही एक अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब ठरली आहे.

## मानवी हक्क...

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.बाळासाहेब आंबेडकर भूषवणार आहेत. तर उद्घाटक म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक तथा मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आवाड हे असणार आहेत. तरी माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक रमेश गवळी यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके, मा.आ मोहनराव सोळंके , मा.आ.राधाकृष्ण होके पाटील , मा.आ. डी.के. देशमुख, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे , ओमप्रकाश शेटे, जयसिंग सोळंके , जयदत्त नरवडे,सचिन उजगरे, उमेश काका मोगरेकर,प्रा.अर्जुन तनपुरे, नितीन दादा नाईकनवरे, श्रीहरी मोरे , सहाल भैय्या चाऊस, नानासाहेब घोडके, प्रभाकर साळेगावकर ,धम्मानंद साळवे, अरुणराव राऊत ,अविनाश तात्या जावळे , डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले ,डॉ. प्रकाश आनंदगावकर, दयानंद स्वामी , शिवाजी सुतार, डॉ. दिनकर मस्के अरुण इंगळे, कचरु तात्या खळगे, मनमोहन कलंत्री ,कॉ. दत्ता डाके, तुकाराम येवले ॲड. तथागत कांबळे , मोहन जाधव ,गंगाभिषण थावरे,भिमराव नाडे,आंकुश जाधव,अजय शिंदे,विजय

◆ पान १ वरून पुढे...

परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्याप्रकरणात गेल्या काही दिवसांपासून गंभीर आरोप करण्यात येत आहेत. संतोष देशमुख प्रकरणातील प्रमुख सुत्रधार वाल्मिक कराडच्या रक्ताच्या व्यक्तींसह काही जणांनी महादेव मुंडे यांची हत्या केल्याचा आरोप वाल्मिक कराडच्या निकटवर्तीय बाळा बांगरने केला होता. या प्रकरणात वाल्मिक कराडच्या मुलाचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जातोय. श्री व सुशील कराड असे दोन वाल्मीक कराडचे मुलं आहेत. त्याचबरोबर गोट्या गित्ते यांच्यासह आणखी काही जणांनी महादेव मुंडेंना वाईट पद्धतीने मारलं. त्यावेळी गळ्याजवळचा तुकडा काढण्यात आला हे पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये देखील समोर आलं आहे. कराडचे जुने सहकारी असलेले बाळा बांगर आता या प्रकरणाबाबत माहिती समोर आणत आहेत. त्यांनी हा तुकडा कराडच्या समोर ठेवण्यात आल्याचे सांगितलं, ही सर्व बाबा मला आज मुंडे कुटुंबाकडून सांगण्यात आली असेही बाळा बांगर यांनी सांगितलं होतं.

## दुचाकी चोरी...

कस्टडी मंजूर आलेली होती. या चौकशीत आरोपी अमित सुतार याने ईतर सहकारी यांच्या सोबत सात दुचाकी चोरी केल्याचे निष्पन्न झाले, यानंतर न्यायालयातर्फे आरोपीस न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आलेली होती व यानंतर बीड जिल्हा सत्र न्यायालयातील ॲड. प्रमोद भगवानराव मिसाळ यांच्यामार्फत आरोपीचे जामीन अर्ज न्यायालयात दाखल करण्यात येवून अत्यंत प्रभावीपणे युक्तिवाद करण्यात आला यामुळे मा. अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयामार्फत आरोपी अमित सुतार यांचा दोन्हीही गुन्ह्यातील जामीन अर्ज दि.२९-०७-२०२५ रोजी मंजूर करण्यात आला. या संपूर्ण प्रकरणांत आरोपीतर्फे ॲड. प्रमोद भगवानराव मिसाळ यांनी काम पाहिले तर त्यांना ॲड. कपिलकुमार विष्णुपंत बेद्रे यांनी सहकार्य केले.

## महादेव मुंडे...

आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंडे कुटुंबीयांची भेट घेऊन मुख्यमंत्र्यांच्या ओएसडींना या प्रकरणात लक्ष देण्याची मागणी केली होती. त्यानंतर आता मुख्यमंत्री कार्यालयाकडून मुंडे कुटुंबीयांना उद्या मुंबई येथे भेटीसाठी बोलावले आहे. याआधी महादेव मुंडे यांना न्याय मिळावा यासाठी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर दोन वेळेला आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यानंतर परळी येथे भर पावसात रास्ता रोको आंदोलन देखील करण्यात आले होते. अशातच काल (मंगळवारी) आमदार रोहित पवार यांनी परळीत महादेव मुंडे कुटुंबीयांची भेट घेतली. मुंडे कुटुंबीयांकडून संपूर्ण प्रकरणाची माहितीही घेतली. यावेळी ते म्हणाले कि, महादेव मुंडे यांचा खून बारा गुंठे जमिनीसाठी झाला. ती जमीन कराड याला घ्यायची होती. श्री कराड हे वाल्मीक कराड यांचे चिरंजीव आहेत, असा मला कळालं. जमिनीचा वाद वाढत गेला पुढे या प्रकरणातूनच त्यांचा खून करण्यात आल्याची माहिती सतीश फड आणि ज्ञानेश्वरी मुंडे यांनी सांगितली.

### गित्ते यांच्यासह आणखी काही जणांनी महादेव मुंडेंना वाईट पद्धतीने मारलं

◆ पान ४ वरून पुढे...

दादा साळवे,ॲड. नारायण गोले,भारत तांगडे ,ॲड. डोंगरदिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मानवी हक्क अभियान च्या सर्व कार्यकर्ते, समाज बांधवांनी या सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक रमेश गवळी यांनी माध्यमाद्वारे केले आहे.

## वंचित अपंग...

अवयव व उपकरणाचे वाटप केले जाणार आहे. वंचित तथा गरजू अपंग व्यक्तींनी दिव्यांग शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. असे आवाहन राष्ट्रवादी शरद पवार कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. दिव्यांगांना शासनाच्या प्रत्येक योजनेचा फायदा मिळाला पाहिजे, नियमितपणे वेळेवर मानधन वाटप व्हावे, मानधनात वाढ करावी, दिव्यांगांच्या घरकुल कोट्यात वाढ करून जास्तीत जास्त घरकुलाचे वितरण व्हावे अशी मागणी काही दिव्यांग व्यक्तींनी यावेळी केली

## परमेश्वर जाधव...

चर्चा करुन प्रेमेश्वर जाधव यांच्या गत काळातील कार्याची दखल घेऊन परमेश्वर जाधव यांचे राजकीय पुनर्वास करत अंपग सेलच्या तालुका अध्यक्ष पदी निवड केलेली आहे. या वेळी निवडीचे पत्र देत आसतांना अण्णा साहेब राठोड यांनी म्हटले आहे की राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या पक्षासाठी आपण दिलेले योगदान लक्षात घेवुन आपली गेवराई तालुका अध्यक्ष अपंग सेल या पदावर नियुक्ती करण्यात येत आहे. पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तम रित्या करुन पक्ष मजबुत करण्यासाठी आपण सर्व शक्तीनिशी योगदान द्याल असा मला ठाम विश्वास वाटतो. समाजातील सर्व घटकांना सोबत घेवुन पक्षाची ध्येय-धोरणे तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय पद्मविभुषण खा.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार सर्वदूर पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्नशिल राहाल अशी अपेक्षा व्यक्त करतो व महाराष्ट्राचे प्रदेश अध्यक्ष शशिकांतजी शिंदे साहेब व संसदरत्न खा. सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार आपली नियुक्ती करण्यात येत आसल्याचे म्हणत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शरदचंद्र पवार गटाचे गेवराई तालुका अध्यक्ष अण्णा साहेब राठोड यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही आसे या वेळी प्रेमेश्वर जाधव यांनी म्हटले असुन या वेळी निवडीचे पत्र देतांना जिल्हाध्यक्ष राजेन्द्र मस्के साहेब, तालुका अध्यक्ष अण्णा साहेब राठोड साहेब, खाडवीचे उप सरपंच विनायक चव्हाण, राम राठोड, सतोष चव्हाण, शहर अध्यक्ष सय्यद अख्तर, सतोष जाधव, रमेश जाधव, अशोक राठोड, रवि सेठ जाधव, सुभाष महाराज, आनंद चव्हाण, बाबासाहेब चव्हाण, प्रकाश चव्हाण, यांची प्रमुख उपस्थिती होती.

## महसूल सप्ताह...

महसूल कर्मचारी यांचा सत्कार तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे . विविध योजनांचे प्रमाणपत्र वितरण समारंभही होणार आहेत . २ ऑगस्ट रोजी शासन निर्णयानुसार २०११ च्या पूर्वीपासून ताब्यात असलेल्या जमीनधारक कुटुंबांना नियमित करण्याची कार्यवाही होईल . त्यांच्यासाठी लाभ वाटप आणि माहिती कार्यक्रम आयोजित केला जाईल . शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबाना ग्रामविकास विभाग , शासन निर्णय , दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ नुसार दिनांक १ जानेवारी, २०११ पूर्वीच्या ग्रामीण भागातील शासकीय जमिनींवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे असलेल्या नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा केली आहे . तर , नगर विकास विभाग , शासन निर्णय , दिनांक ११ सप्टेंबर , २०१९ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या खाजगी जमिनीवरील अतिक्रमणधारकांना पट्टेवाटप

◆ पान १ वरून पुढे...

श्री व सुशील कराड असे दोन वाल्मीक कराडचे मुलं आहेत. त्याचबरोबर गोट्या गित्ते यांच्यासह आणखी काही जणांनी महादेव मुंडेंना वाईट पद्धतीने मारलं. त्यावेळी गळ्याजवळचा तुकडा काढण्यात आला हे पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये देखील समोर आल आहे. कराडचे जुने सहकारी असलेले बाळा बांगर आता या प्रकरणाबाबत माहिती समोर आणत आहेत. त्यांनी हा तुकडा कराडच्या समोर ठेवण्यात आल्याचे सांगितलं, ही सर्व बाबा मला आज मुंडे कुटुंबाकडून सांगण्यात आली असेही ते यावेळी म्हणाले.

## ॲड. प्रकाश कवठेकर...

आहे. सर्वसामान्य कुटुंबामध्ये येऊन बीड जिल्ह्यामध्ये स्वतःचा ब्रँड निर्माण करण्याचे काम त्यांनी केले असून तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस बेवरेजेस, तेजस इंडस्ट्रीज, तेजस अर्बन, तेजस अर्बन मल्टिनिधी, राजनंदनी अर्थमूव्हर्स इत्यादी कंपनी स्थापन करून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध केला आहे. ही कंपनी ग्रामीण भागात उभा करून शेकडो मुलांना रोजगार उपलब्ध केलेला आहे. हा पुरस्कार सिने अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते ॲड. प्रकाश कवठेकर यांना देण्यात आला. यावेळी उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. ॲड. कवठेकर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

## आ.संदीप क्षीरसागरांनी...

- खापरपांगरी व पारगाव सिरस ता. बीड येथे नवीन सबस्टेशन २२० के.व्ही.चे मंजुर करणे.
- DB योजने अंतर्गत बोरखेड व चऱ्हाटा ता. बीड येथे उपकेंद्र उभारण्यात यावे.
- DB योजनेमध्ये मंजुर असलेल्या कामांची निविदा प्रसारित करणे बाबत सुचित करावे.
- बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुका गाव अंतर्गत, शहर अंतर्गत विद्युत तारा लोंबकळेल्या आहेत. तसेच विद्युत पोल वाकलेले आहेत. यांची आवश्यक ठिकाणी दुरूस्ती करावी तसेच वाकलेले पोल आणि लोंबकळत असलेल्या विद्युत तारा बदलण्यात याव्यात.
- मुख्यमंत्री सौर उर्जा अंतर्गत शेतकरी बांधवांना देण्यात आलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे आहे. त्या बाबत संचिकानिहाय चौकशी करण्यात यावी.
- सन २०२० ते जुलै २०२५ या दरम्यान बीड विधानसभा मतदार संघात बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुका अंतर्गत सर्व लेखाशिर्ष अंतर्गत विकास कामे होत असतांना मोठ्या प्रमाणावर दुबारीकरण (ओव्हरलॅपिंग) झालेली आहे. हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला.
- बीड शहराची हद्दवाढ २००७ दरम्यान झालेली आहे. त्यानुषंगाने बीड शहरासाठी नव्याने ३०० पोल, तार, डी.पी. व इतर सामग्री देण्याची मागणी केली.
- बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर का. तालुका नवीन डी.पी.ची आवश्यकता असून मंजुर करणे बाबत मागणी केली.

◆ पान ४ वरून पुढे...

करण्यासंदर्भात कार्यप्रणाली निश्चित करणेबाबत कार्यपध्दती निश्चित केली आहे . ३ ऑगस्टला शिवपानंद रस्त्यांच्या अडथळ्यांबाबत तक्रारींचे निवारण व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचे प्रस्ताव तयार करण्याचे काम होईल . तसेच सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून झाडे लावण्याचेही कार्यक्रम राबवले जातील. ४ ऑगस्टला छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियान अंतर्गत सर्व मंडळांमध्ये माहिती व मार्गदर्शन कार्यक्रम होतील . जनतेला आवश्यक कागदपत्रे आणि आराखडे उपलब्ध करून देण्यात येतील . ५ ऑगस्ट रोजी डी बी टी ( डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर ) अंतर्गत लाभ मिळालेल्या व न मिळालेल्या लाभार्थ्यांबाबत घरपोच सेवा देऊन डिबीटीचा थेट लाभ मिळवून देण्याचे उपक्रम राबवले जातील . ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत निर्णयनिर्देश व पुनर्प्रस्ताव तयार करण्याचे काम केले जाईल . संबंधित प्रकरणांचे तातडीने निपटारा करून शेतकऱ्यांना व नागरिकांना योग्य निर्णय मिळवून दिला जाईल . ७ ऑगस्ट रोजी एम सॅन्ड धोरण ( कृत्रिम वाळू )आणि अंमलबजावणी याबाबत नवे मानक धोरण जनतेसमोर मांडले जाईल . यानंतर महसूल सप्ताहाचा समारोप होईल . या सर्व कार्यक्रमांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी , अधिकारी , ग्रामसेवक , तलाठी व सर्व संबंधित विभाग सहभागी होणार आहेत . विशेष म्हणजे यावेळी लघुपट तयार करून समाजमाध्यमांतून जनजागृती केली जाणार आहे . जिल्हाधिकारी कार्यालयांनी सर्व कार्यक्रमांचे फोटोंसह अहवाल शासनाला सादर करावेत , असेही निर्देश आहेत . सध्या बीड जिल्ह्यात अनेक चांगले महसूल अधिकारी काम करत आहेत . बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक नागरिकांच्या समस्या ऐकून घेतात . तात्काळ संबंधित उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , अगदी मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांना बोलवून ते नागरिकांची कामे जलद गतीने कशी होतील , याकडे लक्ष देतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या सुद्धा शेतकऱ्यांप्रती कनवाळू भूमिकेतून बघतात . विनाकारण कोणालाही त्रास होऊ नये , यासाठी त्या नेहमी बैठकांमध्ये सूचना देत असतात . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्याचा पदभार गेल्यापासून अनेक नवोपक्रम राबविले आहेत . सुरुवातीस त्यांनी प्रत्येक मंडळात बैठका घेतल्या . स्थानिक अधिकारी , कर्मचारी शेतकरी यांच्या समस्या जाणून घेऊन तेथेच निर्णय देण्याचा सपाटा सुरू केला . त्यांच्या कार्यकाळात अनेक रस्ते मोकळे होत आहेत . प्रत्येक गोष्ट समजावून सांगणारे असे तहसीलदार आम्ही बघितले नाहीत , अशी सामान्य शेतकऱ्यांची भावना आहे . स्थानिक पातळीवर मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी सुद्धा शासनाच्या विविध योजना उदाहरणार्थ छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान , शिवपानंद रस्ते काढून देणे , जिवंत सातबारा मोहिमा राबविणे इत्यादी कामे वेगाने करीत आहेत . महसूल सप्ताहाच्या निमित्ताने महसूल विभागाच्या विविध कामांमध्ये पारदर्शकता आणण्याचा आणि लोकांच्या थेट सहभागातून त्यांचा विश्वास संपादन करण्याचा शासनाचा हा प्रयत्न आहे . बीड जिल्हा यात नक्की अग्रेसर राहील यात शंका नसावी .

## महाजनवाडी येथे...

पाहतात, किंमती कमी करायला लावतात, आणि दोन-दोन दिवस हेलपाटे मारायला लावतात, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांवर पोलिस प्रशासन नियंत्रण आणण्यात अपयशी ठरत आहे. शेतकरी उपयोगी साहित्य - मोटारी, वायर, सौर पंप चोरीला जात असतानाही नीट तपास केला जात नसल्याने चोरांचे मनोधैर्य अधिकच वाढले आहे. यामुळे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी दिला आहे. प्रमुख मागण्या : १. शेतकऱ्यांच्या तक्रारी तत्काळ घेतल्या जाव्यात. २. चोरीच्या घटनांचा तपास जलद गतीने करावा. ३. पोलिसांनी शेतकऱ्यांवर अन्याय न करता सहकार्य करावे. ४. नुकसान भरपाईसाठी योग्य किंमतीचा आधार मानावा.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगावात भव्य खुली चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न: ज्ञानेश्वर मेंडके

## हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग, कला-सामाजिकतेचा अनोखा संगम



**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्याच्या लोकप्रिय नेत्या आणि पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव मतदारसंघात प्रथमच भव्य स्वरूपात खुल्या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांच्या साक्षीने पार पडलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा उत्स्फूर्त आविष्कार पाहायला मिळाला. या भव्य उपक्रमाचे आयोजन भाजप नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांच्या संकल्पनेतून झाले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारी ही स्पर्धा शालेय, महाविद्यालयीन तसेच खुल्या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी खुली होती. माजलगाव तालुक्यांतील विविध शाळा, महाविद्यालयांमधून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेत ना. पंकजाताई मुंडे यांचे हुबेहूब चित्र सादर केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. सुरेंद्र रेदासनी (स्थानिक शालेय समिती अध्यक्ष, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थाअंबाजोगाई) होते. प्रमुख पाहुणे म्हणून अमरनाथ खुरपे (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था) यांची उपस्थिती लाभली.

तसेच कार्यक्रमास भाजप राज्य परिषद सदस्य अरुण राऊत, मा. नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके, शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, किट्टी आडगाव मंडळ अध्यक्षा सौ. रूपालीताई कचरे, दीपक मुंडे यांच्यासह ज्ञानेश्वर सरवदे, अविनाश कंडूरे, सत्यनारायण उनवणे, ईश्वर खुरपे, शहर उपाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, महिला कार्यकर्त्या सौ. छायाताई कुलकर्णी, उपाध्यक्षा सौ.पूजाताई मुंडकर, चिटणीस सौ.चित्राताई पाठक, सुप्रियाताई मालानी ,सरचिटणीस मुन्ना जाधवर, सतीश राठोड, कैलास खुरपे, दत्ता महाजन, सतीश जोशी, शहर उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण,दत्ता क्षिरसागर,राम शिंदे, नितीन डुकरे,दत्ता जाधव, सुशांत जाधवर,विष्णू आगे राजेभाऊ सरवदे आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते. या स्पर्धेसाठी आयोजकांनी आकर्षक रोख रक्कम आणि सन्मानचिन्हांसह पारितोषिके ठेवण्यात आली होती. यामध्ये प्रथम पारितोषिक: ₹११,१११,द्वितीय पारितोषिक: ₹७,७७७,तृतीय पारितोषिक: ₹५,५५५ प्रथम तीन विजेत्यांना रोख रकमेसह प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत. तर सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस व सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजप नेते शरद कचरे, उपाध्यक्ष कल्याण शेप, भरत जोशी, नारायण मेंडके, रवी गायकवाड, लक्ष्मण गायकवाड सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, दिव्य मराठीचे पत्रकार दिलीप झगडे, यांच्यासह नितीन काळे सर, नवनाथ सांगुळे सर, माधव जोशी सर, पंडित मेंडके सर यांनी परिश्रम घेतले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सौ. रूपालीताई कचरे (नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष, किट्टी आडगाव मंडळ माजलगाव) यांनी केले, तर समारोप सौ. गौरीताई देशमुख (मा. महिला तालुकाध्यक्ष, माजलगाव) यांनी केला. या उपक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना ना. पंकजाताई मुंडे यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय योगदानाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच एक सशक्त महिला नेतृत्वाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने ही स्पर्धा राबवण्यात आली. हा उपक्रम केवळ चित्रकला स्पर्धा न राहता, विद्यार्थ्यांच्या भविष्यातील नेतृत्वाचा पाया घालणारा सामाजिक महोत्सव ठरला आहे.

# आ.रोहितदादा पवार यांच्या हस्ते बाबासाहेब शिंदे यांना तालुकाध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र प्रदान

## आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांच्यासह नेतेमंडळींची उपस्थिती

**परळी वै. । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष म्हणून बाबासाहेब शिंदे यांना नियुक्त करण्यात आले असून, नुकतेच त्यांना पक्षाचे सरचिटणीस आ.रोहितदादा पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या शिफारशीवरून ही नियुक्ती करण्यात आली असल्याचं जाहीर करण्यात आले आहे. यावेळी आ.संदीप भैय्या क्षीरसागर, परळी विधानसभेचे राजेभाऊ फड यांच्यासह प्रमुखांची उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आ.रोहितदादा पवार हे मंगळवारी परळी वैजनाथ दौऱ्यावर होते. या भेटीदरम्यान त्यांनी बाबासाहेब शिंदे यांना अधिकृतपणे तालुकाध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे पत्र प्रदान केले व नव्या निवडीबद्दल अभिनंदन आणि शुभेच्छा दिल्या. निवडपत्र प्रदान करतेवेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, आ.संदीप भैय्या क्षीरसागर, परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड, अंकुशराव ढोबळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# वडवणीच्या रेणुकामाता संस्थानात शिवमहापुराण कथेचे आयोजन; सलग दुसऱ्या वर्षी आयोजनाने भाविकांना पर्वणी

**वडवणी । प्रतिनिधी**



शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजीपासून करण्यात आले आहे. तर या कार्यक्रमाची सांगता दि.१० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी होणार आहे. तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला भगिनींसह शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत श्रवणाचा अवश्य लाभघ्यावा असे आवाहन संयोजक समस्त वडवणी पंचक्रोशीतील भाविक भक्त व रेणुकामाता संस्थानचे प्रमुख अण्णा महाराज द्वाळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री. रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथाचे आयोजन येत्या दुसरा श्रावण सोमवारी म्हणजेच दि.४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजीपासून दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत संस्थान सभामंडपात करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. शालीग्राम महाराज मते लोणीकर हे या शिवमहापुराण कथेचे प्रवक्ते असून त्यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबणार आहे. याप्रसंगी सिंथ बादक ह.भ.प.माऊली महाराज घुमरे, तर तबला वादक ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे हे उपस्थित असणार आहेत. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिले आहे.

# लोकशाहीर डॉ.आण्णा भाऊ साठे जन्मोत्सव निमित्त, त्यांच्या जीवनप्रवासाचे संकलन: आकाश कांबळे

**तलवाडा । प्रतिनिधी**

साहित्यरत्न डॉ.आण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव साठे व आईचे नाव वालुबाई साठे होते. अण्णाभाऊ हे शाळेत शिकलेले नाहीत, ते केवळ दीड दिवस शाळेत गेले नंतर तेथील सवर्णाद्वारे होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी दोन लग्न केली होती त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे ह्या आहेत. त्यांना एकूण तीन अपत्य होती - मधुकर, शांता, आणि शकुंतला. त्यांचे शालेय शिक्षण झालेले नाही, तरीसुद्धा त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षर ज्ञान मिळविले हे बाहेरील जगातून स्वतःहून अक्षरफोड करून घेतली. १९३२ साली वडिलांसोबत मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचने, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी केली, अशी अनेक मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले.

त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. आणि नियतीने वेगळेच रूप दाखवले वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलत भावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. पुढे १९४२ च्या चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर पकड वॉरंट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. मुंबईत लोकशाहीर म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला 'स्तालिनग्राडचा पोवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला.

त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लालबावटा' कलापथक स्थापन केले. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. । जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव । हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यात 'माझी मैना गावावर राहिली', आणि 'मुंबईची लावणी' या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. अतिशय तळमळीने लिहिण्याची त्यांची वृत्ती होती. 'पृथ्वीही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे', असे ते म्हणत ; आणि हाच त्यांच्या लेखनाचा प्रेरणास्त्रोत होता. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख दारिद्र्य, त्यांच्या साहित्यातून प्रकट होत होते. अण्णाभाऊंची निरीक्षण शक्ती सूक्ष्म होती. त्यांच्या लेखन शैलीला मराठमोळा, रांगडा पण लोभस घाट आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठात अण्णाभाऊ ११ प्रबंध सिद्ध केले गेले आहेत.

# अशोक डकांनी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवराच्या विरोधात काम केले

## विधानसभा अध्यक्ष व तालुकाध्यक्षांची पक्षाध्यक्ष अजित पवारांकडे तक्रार

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील अशोक गोविंदराव डक यांनी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या विरोधात काम केले असल्याने त्यांचेवर कारवाई करावी तसेच पक्षाच्या नेत्याचे फोटो व पक्षाचे चिन्ह वापरण्यास मनाई करून पक्षातुन हकालपट्टी करावी अशी मागणी मतदारसंघाचे विधानसभा अध्यक्ष व मतदार संघातील तालुकाध्यक्षांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचेकडे केली आहे.

दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, अशोक डक यांनी २२९ माजलगाव विधानसभा मतदारसंघ ता. माजलगाव जि. बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार यांच्या विरोधात काम केले असून आता पक्ष सत्तेत आल्यानंतर ना. अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पेपर ला जाहिराती देवुन घड्याळाचे चिन्ह जाहिरातीत टाकले आहे. तसेच ना. अजित पवार हे माजलगाव विधानसभा मतदारसंघात प्रचार सभेसाठी आले असतांना तत्कालीन मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक होते. पदावर असतांना देखील यांनी त्यावेळेस पेपरला जाहिरात दिली नाही, स्वागताचे होल्डींग बॅनर लावले नाही. व आता सभेकडे फिरकल देखील नाहीत, ना. अजित पवार यांच्या वाढदिवसाचे शहरभर होल्डींग लावुन व पेपरला जाहिरात देवुन मी स्वतः पक्षाचा नेता असल्याचे भासवत आहे. व माझी कधी न संपणारी प्रेरणा ना. अजित पवार आहेत असे भासवत आहेत. यामुळे पक्षाच्या स्थानिक कार्यकत्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करत आहे. त्यामुळे अध्यक्षानी याची दखल घेवुन संबंधित व्यक्तीस पक्षाचे चिंन्ह व पक्षाच्या नेत्याचे फोटो वापरण्यास मनाई करावी व पक्षातुन कायम स्वरूपी हकालपट्टी करावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर माजलगाव विधानसभा अध्यक्ष जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, धारूर तालुकाध्यक्ष अमोल जगताप, वडवणी तालुकाध्यक्ष महादेव साबळे यांच्या स्वाक्षरी आहेत.

# आर्यवैश्य समाजातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेकडे देखील आपले ध्येय म्हणून बघावे : गादेवार

## केज येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार व अमृत महोत्सव संपन्न

**केज । प्रतिनिधी**



समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा ओढा इंजिनिअरिंग , डॉक्टर , व सी ए याकडे आहे हि चांगली बाब आहे पण आता यापलीकडे जाऊन आता स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून मोठ्या पदांवर कार्य करण्याची महत्वाकांक्षा देखील बाळगावी लागेल ती काळाची गरज आहे असे स्पष्ट मत महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी व्यक्त केले ते बीड जिल्हा महासभेच्या वतीने केज येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार व पंच्याहत्तर वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तींच्या अमृत महोत्सव सोहळ्या प्रसंगी बोलत होते

केज येथील श्रीराम मंगल कार्यालयात रविवार दि २७ रोजी आयोजित या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून नंदकुमार गादेवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गोविंद बिडवई , प्रदीप मनाठकर , सदानंद मेडेवार हे होते , तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ सतिष साळुंके व अमृत चे मराठवाडा व्यवस्थापक सुशांत देशपांडे , यांची उपस्थिती होती .

पुढे बोलताना गादेवार म्हणाले कि ; पारंपरिक उद्योगांना थोडेसे बाजूला करत मागील काही वर्षात आपल्या समाजातील विद्यार्थ्यांनी डॉक्टर , सी. ए , इंजिनिअर , आय टी क्षेत्रात आपले करिअर निवडले आता यासोबतच आणखीन नवीन दिशांची निवड देखील करावी लागणार आहे यात आता विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे लक्ष केंद्रित करत शासनाच्या मोठ्या पदांवर देखील विराजमान होणे गरज असल्याचे सांगितले तसेच समाजातील पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या व्यक्तींचा अमृत महोत्सव सार्वजनिक मंचावर साजरा होणाऱ्या या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमातून त्यांचा सत्कार करता येण्याचे भाग्य आपणास मिळाल्याचा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले आपल्या आई वडिलांचा उतारवयात सांभाळ करणे हि आपली सनातन संस्कृती आहे त्यामुळे त्यांना कोणीही एकटे अथवा वृद्धाश्रमात सोडू नये अशी विनंतीही त्यांनी यावेळी केली समस्थ समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र तिरुपती येथे पंचेवीस कोटी रुपये खर्च किमतीच्या होऊ घातलेल्या निवासी संकुलाची ईमारत देखील दीड वर्षात पूर्ण करू अशी ग्वाही देत यासाठी समाजबांधवांनी योगदान द्यावे असे आवाहनही याप्रसंगी केले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला . कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून तीनशे ते चारशे समाजबांधवांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रमोद बिडवई यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हासचिव अजय रुद्रवार यांनी केले .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रोजेक्त चेअरमन सुहास चिद्रवार , वैभव झरकर , बालाजी बासटवार , गणेश डुबे , प्रकाश कामाजी , अमित कामाजी यांच्यासह केज येथील समाजबांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

### दव्यांग वैभवचा केला विशेष सत्कार

**अपघातात आपले दोन्ही हात गमावलेल्या वैभव पईतवार या धारूर येथील युवकाने आपल्या अपंगत्वावर मात करत एमपीएससी स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल त्याचा विशेष असा सत्कार यावेळी करण्यात आला**


बीएचआर/केआयजे/आरएसआर/सीआर/८०७/२००३दि.१७-७-२००३ फो.(०२४४५)२३४६०८

## शिवरामपुरी ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्था म. विडा ता. केज जि. बीड

### वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

सर्व सभासद शिवरामपुरी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था म. विडा ता. केज जि. बीड यांना कळविण्यात येते की, संस्थेची २२ वी वार्षिक सर्व साधारण सभा पतसंस्थेमें अध्यक्ष श्री बाबासाहेब अभिमान मुळे यांचे अध्यक्षतेखाली **रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठाण सामाजिक सभागृह, अंबळाचे बरड (सारूळ) ता. केज जि. बीड** येथे दि. १३/०८/२०२५ बुधवार रोजी दुपारी ठिक १-०० वाजता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहुन उपकृत करावे, ही विनंती.

जा. क्र. १८०/२०२५-२६ **सभेपुढील विषय** नोटीस पाठवल्याचा दिनांक २८/०७/२०२५

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १३/०८/२०२४ चा वृत्तांत वाचुन कायम करणे.
२. सन २०२४ - २०२५ या वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेला वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके वाचणे व मान्यता देणे.
३. सन. २०२४ २०२५ या वर्षाच्या अंदाज पत्रकास तसेच सन. २०२४- २०२५ वर्षाच्या अंदाज पत्रकास तुलनात्मक खर्चास मान्यता देणे.
४. सन २०२४ २०२५ या वर्षांचा लेखा परिक्षण अहवाल तसेच सन २०२३ २०२४ वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व निरसन अहवाल प्रतिवृत्तास मान्यता देणे.
५. सन २०२४ २०२५ वर्षांच्या संचालक मंडळाने केलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे.
६. सन २०२५ २०२६ साला करिता सवैधानिक लेखा परिक्षकाची नियुक्ती व त्यांना देण्यात यावयाच्या मावेजास मान्यता देणे.
७. पतसंस्था पोटनियत दुरुस्ती
८. एकमुस्त रक्कम कर्ज भरणा करणे बाबतच्या योजनेस अनुसरुन सन २०२४-२५ मधील अनुत्पादक कर्जास तडजोडीने दिलेल्या सुटीस मान्यता देणे यायत चर्चा करणे.
९. पतसंस्थे अंर्तगत कर्मचाऱ्यांना सेवा नियम लागु करणे बाबत मान्यता देणे.
१०. आयत्या वेळी येणारे विषय मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने.

**-: स्थळ :-**
**रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठाण सामाजिक सभागृह**
**अंबळाचे वरड ( सारुळ)**
**ता. केज, जि. बीड**

**- संचालक मंडळाचे आदेशावरुन-**
**श्रीमती सुनिता लक्ष्मण कदम**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**शिवरामपुरी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था**
**म. विडा, ता. केज जि. बीड**

**टिप:-**
१. वार्षिक सर्वसाधारण समेत कांही प्रश्न अथवा सुचना असल्यास दि. ०६/०८/२०२५ पर्यंत पतसंस्थे कडे लेखी कळवावे अन्यथा त्याचा विचार करणे बंधन कारक नाही.
२. पत संस्थे विषयक कांही माहिती अवश्यक असल्यास दि.०६/०८/२०२५ वरील मुदतीत पत संस्थेत उपलब्ध आहे.
३. सभा कोरम अभावी स्थगित झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी त्याच विषयावर चर्चेसाठी १ तासानंतर सुरु होईल. त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.
४. ४. दि. ३१-०३-२०२५ पूर्वी सभासद असतील त्यांनाच या सभेत भाग घेता येईल.

दैनिक

# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. ३१ जुलै २०२५ ● पान ४

# बीड जिल्ह्यात ७३.६६% शेतकऱ्यांनी घेतला फार्मर आयडी

## प्रशासनाचे शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या फार्मर आयडी नोंदणी मोहिमेला बीड जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे . जिल्ह्यातील एकूण ६,२१,५१६ पात्र शेतकऱ्यांपैकी ४,६१,८८९ शेतकऱ्यांनी आपली फार्मर आयडी नोंदणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे . हे प्रमाण ७३.६६ टक्के इतके असून



, उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने आपली नोंदणी करून घ्यावी , असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन केले आहे . २४ जुलै रोजी सर्व महसूल अधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली होती यावेळी अपर जिल्हाधिकारी सर्व उपजिल्हाधिकारी तहसीलदार उपस्थित होते . या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी यांनी उर्वरित शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तात्काळ काढून घेण्याबाबत आवाहन केले होते .

यासंदर्भात बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे –

▶▶ उर्वरित पान २ वर

# भविष्यात या टिपरे महोत्सवाला व्यापक स्वरुप देण्यात येणार: आ. विजयसिंह पंडित

## शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने मला आशिर्वाद देऊन विधानसभेत काम करण्याची संधी दिली, त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. केवळ राजकारण न करता टिपरे महोत्सवा बरोबरच विविध उपक्रम राबवून गेवराईची संकृती जतन करण्याचे काम करण्यात येत आहे.भविष्यात



या टिपरे महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यात येणार आहे असे प्रतिपादन महोत्सवाचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांनी केले. शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल, केज या शाळेस CBSE बोर्डाची मान्यता

**केज । प्रतिनिधी**

विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल केज या शैक्षणिक संस्थेस केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (उइडए) दिल्ली यांची मान्यता प्राप्त झाली असून संस्थेने केलेल्या म हत्वपूर्ण वाटचालीस यश मिळाले आहे. केज शहरापासून जवळच असलेल्या विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूलची उइडए निरीक्षण समितीमार्फत दिनांक २३ जुलै २०२५ रोजी तपासणी करण्यात आली.या समितीमध्ये पुणे येथिल सिंहगड स्कूलच्या प्राचार्या श्रीमती स्मिता सावंत,आणि पुणे येथिल भारती विद्यापीठाच्या प्राचार्या श्रीमती भावना राय यांचा समावेश होता.तपासणी दरम्यान समितीच्या सदस्यांनी ग्रामीण भागात उभारण्यात आलेल्या उत्कृष्ट शैक्षणिक सुविधांचे कौतुक केले. शाळेतील पायाभूत सुविधा,शिस्तबद्ध व्यवस्थापन तसेच विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेले प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण पाहून समिति कडून समाधान व्यक्त केले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात

### खतविक्रेत्यांना ई-पॉस प्रणाली अनिवार्य: नियमांचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द होणार

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व किरकोळ रासायनिक खत विक्रेत्यांनी अनुदानित रासायनिक खतांची विक्री ई-पॉस (श-झेड) प्रणालीद्वारे करणे बंधनकारक आहे. खत विक्रीच्या नोंदी तात्काळ आणि अचूकपणे या प्रणालीमध्ये समाविष्ट होणे अत्यंत आवश्यक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

ई-पॉस आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत नसावी: विक्रेत्यांच्या ई-पॉस प्रणालीवरील खत साठा आणि गोदामातील प्रत्यक्ष साठा यात कोणतीही तफावत आढळू नये, यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. रासायनिक खतांच्या विक्रीची नोंद ळऋचड प्रणालीमध्ये तत्काळ (ठशरश्र ढळाश) घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. क्षेत्रीय स्तरावरील खत निरीक्षकांना या संदर्भात नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या विक्रेत्यांकडे ई-पॉसवरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठा यात फरक आढळेल, त्यांच्या परवान्यांवर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना परवाना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

नवीन ङ१ सिक्युरिटी ई-पॉस मशीन त्वरित प्राप्त करा: या खत विक्रेत्यांनी अद्याप नवीन ङ१ सिक्युरिटी ई-पॉस मशीन प्राप्त केलेले नाहीत, त्यांनी तात्काळ जिल्ह्यातील कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून १० ऑगस्ट २०२५ पूर्वी हे मशीन प्राप्त करून कार्यान्वित करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### रेड रन मॅरेथॉन बीडमध्ये उत्साहात : राज्यस्तरीय स्पर्धे साठी विजेत्यांना संधी

**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय युवा दिन आणि युवा पंधरवड्यानिमित्त जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष व जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने 'रेड रन मॅरेथॉन' स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. बीड शहरातील वाय जंक्शन, चऱ्हाटा रोड येथे ५ किमी अंतराच्या जिल्हास्तरीय मॅरेथॉनमध्ये १५ महाविद्यालयांतील ४३ युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत आणि जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, डॉ. हनुमंत पारखे, डॉ. अरुण राऊत, सामाजिक कार्यकर्ते तत्वशील कांबळे आणि रेड रिबन क्लबचे नोडल अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक विजेत्यांना अनुक्रमे ₹२०००, ₹१५०० व ₹१००० रोख पारितोषिकांसह प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात समुपदेशक अमोल घोडके यांनी नियमावलीची माहिती दिली. विद्यागर यांनी युवकांना एचआयव्ही/एड्स जनजागृती व खेळाच्या विविध क्षेत्रांमध्ये पुढे येण्याचे आवाहन केले. डॉ. राऊत यांनी अध्यक्षीय भाषणात विजेत्यांचे अभिनंदन करून भावी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन जनार्धन माचपल्ले यांनी तर आभार सुहास कुलकर्णी मानले. राज्यस्तरीय संधी : युवक व युवती गटातील प्रथम व द्वितीय क्रमांक विजेत्यांना मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी ▶▶ उर्वरित पान २ वर

# मानवी हक्क अभियान आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहा : रमेश गवळी

## अॅड.बाळासाहेब आंबेडकर, प्रा.डॉ.मिलिंद आवाड यांच्या प्रमुख उपस्थिती

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

तळागाळातील समाजाच्या तरुणांनी डॉक्टर, वकील, पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना मनी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एकेकाळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथरावजी (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून



समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव आयोजित लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा १ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे पार पडत आहे.या

▶▶ उर्वरित पान २ वर

# वंचित अपंग व्यक्तींनी दिव्यांग शिबिराचा लाभ घ्यावा: राजेंद्र मस्के

● दिव्यांग शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या संकल्पनेतुन सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, भारतीय कृत्रिम अंग निर्माण, जिल्हा प्रशासन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाभरात प्रत्येक तालुका निहाय दिव्यांग शिबिराचे आयोजन केले जात आहे. आज गेवराई





येथील पंचायत समिती येथे शिबिर संपन्न झाले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अपंग तथा दिव्यांग व्यक्तींसाठी शासनाच्या विविध योजना असून प्रत्येक अपंग व्यक्तींना योजनेचा लाभ आणि अत्यावश्यक उपकरण आणि साधन मिळाली पाहिजेत. अनेक अपंग व्यक्ती योजने पासून वंचित आहेत. यासाठी दिव्यांग शिबिराचे आयोजन केले जात आहे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकां साठी कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने मोफत वाटपासाठी पूर्व तपासणी व नोंदणी करून पात्र दिव्यांगांना कृत्रिम

▶▶ उर्वरित पान २ वर

# परमेश्वर जाधव गंगावाडीकर यांची राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या अपंग सेलच्या तालुका अध्यक्ष पदी निवड

## राजकीय देवदुताच्या रूपात प्रेमेश्वर जाधव यांना अण्णा साहेब राठोड भेटले,, जाधव यांचे राजकीय पुनर्वसन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील गोदाकाठी आई त्वरितादेवीच्या साग्धीज्ञात वसलेल्या गंगावाडी येथील रहिवाशी आसलेले परमेश्वर गोपीनाथ जाधव हे गेली तीस वर्षा पासुन सातत्याने सामाजिक कार्यात कार्यरत असुन गेवराई तालुक्याचे लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडीत यांच्या आमदारकिच्या कार्यकाळ ते मंत्री पदा पर्यंतच्या कार्यकाळात परमेश्वर जाधव हे गेवराई तालुक्यातील अंपगांच्या प्रश्नासह विविध प्रश्न घेऊन सतत



मुंबईच्या वा-या करुन प्रश्न सोडवत होते. परंतु मधिल काही काळात सतेत झालेले बदल विविध प्रश्न सोडवण्यास अडथळा निर्माण करत होते. अधुन मधुन प्रेमेश्वर जाधव लोकांचे प्रश्न घेऊन तालुका जिल्हा व मंत्रालयात तत्पर दिसुन येत होते. राजकिय पाठबळ दुरावल्यामुळे परमेश्वर जाधव थोडे निराक्षेने ग्रासले होते आस्यातच शरदचंद्र पवार गटाचे गेवराई तालुक्यातील युवा नेतृत्व राजकीय देवदूत तालुका अध्यक्ष आदरणीय अण्णा साहेब राठोड यांनी वरिष्ठांशी

▶▶ उर्वरित पान २ वर

# महसूल सप्ताह २०२५ : जनतेच्या सेवेसाठी राज्य शासनाचे विविध उपक्रम

## एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट अनेक उपक्रम बीड जिल्ह्यात राबविले जाणार

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी महसूल दिन व १ ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यान महसूल सप्ताह २०२५ राज्यभर साजरा केला जाणार आहे . यामध्ये सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांतून विविध समाजोपयोगी उपक्रम , जनजागृती मोहिमा व योजनांचे थेट लाभ वितरण केले जाणार आहे . याचा उद्देश नागरिकांना महसूल



विभागाच्या सेवांबाबत जागरूक करणे व त्यांचा थेट सहभाग वाढवणे आहे .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्याचा पदभार घेतल्यापासून अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत . सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी त्यांनी जनता दरबार सुरू केला . अनेक तालुक्यांना सुद्धा भेटी दिल्या . बाल विवाहप्रथा , शेतकरी आत्म हत्या या विषयावर ते पोटतिडकीने बोलत असतात .

महसूल सप्ताहाच्या प्रारंभदिनी , १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा केला जाईल . या दिवशी जिल्हास्तरीय अधिकारी , पोलीस , ▶▶ उर्वरित पान २ वर

# महाजनवाडी येथे सौर ऊर्जेच्या मोटारीची चोरी ; नेकनुर पोलिसांकडून फिर्यादीला त्रास

● शेतकऱ्यांचा संताप

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीमध्ये शेतकऱ्यांच्या सौर ऊर्जा पंप, विद्युत मोटारी, रोहित्राच्या वायर इत्यादींच्या चोरीच्या घटनांमध्ये सतत वाढ होत असून, प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर महाजनवाडी येथील शेतकरी रामचंद्र घरत यांच्या शेतातील नुकत्याच बसवलेल्या





मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतील पंपाची चोरी झाली.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, नेकनुर पोलिस प्रशासनाने तक्रार घेण्यास दोन दिवस टाळाटाळ करत, अखेर लिंबागणेश पोलिस चौकीत सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख यांनी तक्रार लिहून घेतली. मात्र, यामध्ये आणखी गंभीर बाब म्हणजे पंपाची मूळ किंमत ₹६५,००० असतानाही पोलिसांनी ती केवळ ₹२ ते ₹४ हजार दाखवण्याचा आग्रह धरला.

सोने दुकानातून बाहेर गेल्यावर जशी किंमत कमी होते, तशीच या पंपाची देखील झाली आहे, असे अजब स्पष्टीकरण नेकनुर पोलिसांनी दिले, असे रामचंद्र घरत यांनी सांगितले. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. पोलिस चोरांना पकडण्याऐवजी फिर्यादीलाच संशयाच्या नजरेने

▶▶ उर्वरित पान २ वर